सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक :- विकाअ/शिक्षण/परिपत्रक/२०२५/3467
दिनांक :- 24 DEC 2025

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अनुदानित/ विनाअनुदानित
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- दि.२६ डिसेंबर, २०२५ रोजी "वीर बाल दिवस" साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ :-१.** मा. सचिव, भारत सरकार, महिला एव बाल विकास मंत्रालय, शास्त्री भवन, नई दिल्ली यांचे पत्र क्र.D.O.No.३१/८/२०२५-CW-I, दिनांक १० डिसेंबर, २०२५
२. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे दि.२१/१२/२०२५ रोजीचा ईमेल
३. या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/ परिपत्रक/२०२५/३५३२, दि.२२/१२/२०२५
४. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र क्र.DTEM-D१६/१३२/२०२५-DESK१६ दि.२४/१२/२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, मा. पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदी यांनी ९ जानेवारी २०२२ रोजी, श्री गुरु गोबिंदसिंहजी यांच्या प्रकाशपर्वाच्या निमित्ताने, दरवर्षी २६ डिसेंबर हा "वीर बाल दिवस" म्हणून साजरा करण्याची घोषणा केली आहे. शीख धर्माचे दहावे गुरु श्री गुरु गोबिंदसिंहजी यांचे चार सुपुत्र साहिबजादे बाबा अजीतसिंह बाबा जुझारसिंह बाबा जोरावरसिंह व बाबा फतेहसिंह यांनी धर्म, स्वातंत्र, सत्य व न्यायाच्या रक्षणासाठी अलौलिक शौर्याने बलिदान दिले. विशेषत: अल्पवयीन साहिबजादे बाबा जोरावरसिंहजी ( वय ८ वर्ष ) व बाबा फतेहसिंहजी (वय ६ वर्ष ) यांनी धर्मांतरास नकार देत हौतात्म्य पत्कारले, ही घटना भारतीय इतिहासातील अव्दितीय शौर्याचे प्रतीक आहे.

मा. पंतप्रधान महोदय यांनी आपल्या संदेशात नमूद केले आहे की, "साहिबजाद्यांचे बलिदान देशातील बालकांमध्ये आणि युवकांमध्ये धैर्य, नीतीमुल्ये आत्मसन्मान व देशभक्तीची भावना निर्माण करण्यासाठी सदैव प्रेरणादायी राहिल. या अनुषंगाने वीर बाल दिवसाचे औचित्य साधून युवकांमध्ये चारित्रनिर्मिती राष्ट्रनिष्ठा व नैतिक मुल्यांचा प्रसार करणे अपेक्षित आहे."

संदर्भीन शासन पत्रात दिलेल्या निर्देशानुसार आपणास पुनश्चः निर्देश देण्यात येते की, दि.२६ डिसेंबर २०२५ रोजी "वीर बाल दिवस" न चुकता साजरा करण्यात यावा.

तसेच संदर्भीय पत्रान्वये केलेल्या कार्यवाहीचा कार्यपूर्ती अहवाल सहा दिवसात या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सहपत्र :- वरील प्रमाणे.

**(डॉ. व्हि. आर. मानकर )**
प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर /ईमेल टाकण्याकरीता.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल-desk१६@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

E-Office File No. DTEM-D16/132/2025-DESK16

महत्वाचे/कालमर्यादा

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

विषय- दि.२६ डिसेंबर, २०२५ रोजी "वीर बाल दिवस" साजरा करण्याबाबत.

संदर्भ-१. शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१३०/साशि, दि-१९.१२.२०२५.

२. संचालनालयाचे पत्र क्र. DTEM-D१६/१३२/२०२५-DESK१६, १/२०३१६१४/२०२५, दि-२३.१२.२०२५.

३.भारत सरकार यांचे महिला एवं बाल विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि. १६.१२.२०२५ चे अर्धशासकीय पत्र.

४. शासनाचे पत्र क्र. क्रमांक:- संकीर्ण-२०२५/प्र.क्र. १३०/साशि,दि-२३.१२.२०२५

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाकित पत्रांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. त्याचे अवलोकन करावे.

उपरोक्त विषयानुषंगाने कळविण्यात येते की, मा. पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदी यांनी ९ जानेवारी २०२२ रोजी, श्री गुरु गोबिंदसिंहजी यांच्या प्रकाशपर्वाच्या निमित्ताने, दरवर्षी २६ डिसेंबर हा "वीर बाल दिवस" म्हणून साजरा करण्याची घोषणा केली आहे. शीख धर्माचे दहावे गुरु श्री गुरु गोबिंदसिंहजी यांचे चार सुपुत्र साहिबजादे बाबा अजीतसिंह, बाबा जुझारसिंह, बाबा जोरावरसिंह व बाबा फतेहसिंह यांनी धर्म, स्वातंत्र्य, सत्य व न्यायाच्या रक्षणासाठी अलौकिक शौर्याने बलिदान दिले. विशेषतः अल्पवयीन साहिबजादे बाबा जोरावरसिंहजी (वय ८वर्षे) व बाबा फतेहसिंहजी (वय ६ वर्षे) यांनी धर्मांतरास नकार देत हौतात्म्य पत्करले, ही घटना भारतीय इतिहासातील अद्वितीय शौर्याचे प्रतीक आहे.

मा. पंतप्रधान महोदय यांनी आपल्या संदेशात नमूद केले आहे की, "साहिबजाद्यांचे बलिदान देशातील बालकांमध्ये आणि युवकांमध्ये धैर्य, नीतिमूल्ये, आत्मसन्मान व देशभक्तीची भावना निमार्ण करण्यासाठी सदैव प्रेरणादायी राहील." या अनुषंगाने वीर बाल दिवसाचे औचित्य साधून युवकांमध्ये चारित्र्यनिर्मिती राष्ट्रनिष्ठा व नैतिक मूल्यांचा प्रसार करणे अपेक्षित आहे.

भारताचे मा. पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी भारत मंडपम, नवी दिल्ली येथे वीर बाल दिवस चा मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

त्यानुषंगाने, दि.२६ डिसेंबर २०२५ रोजी वीर बाल दिवस साजरा करण्याचे निर्देश संचालनालयाच्या संदर्भिय क्र. २ च्या पत्रान्वये यापूर्वी आपणास दिलेले आहे.

संदर्भाधिन शासन पत्रात दिलेल्या निर्देशानुसार, आपनास पुनःश्च निर्देश देण्यात येते की, "दि.२६ डिसेंबर २०२५ रोजी वीर बाल दिवस" न चुकता साजरा करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व सर्व शासकीय/ शासकीय अनुदानित/ विनानुदानित तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये, औषनिर्माणशास्त्र महाविद्यालये व तत्सम संस्था यांना सूचित करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीबाबतचा एकत्रित अहवाल आठ दिवसांत संचालनालयाच्या desk१६@dtemaharashtra.gov.in या ईमेल आयडीवर सादर करण्यात यावा.

Signed by
Vinod Mahadeorao Mohitkar
Date: 24-12-2025 18:09:22

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय म. रा., मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरिता-

प्राचार्य, सर्व शासकीय/ शासकीय अनुदानित/ विनानुदानित तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये, औषनिर्माणशास्त्र महाविद्यालये व तत्सम संस्था.